# ज्ञानेश्वर माऊली आणि संजीवन समाधी

ज्ञानेश्वर माऊली ह्यांच्या संजीवन समाधीला ७२५ वर्षे पूर्ण झाली. किती मोठा कालखंड आहे ! ज्ञानेश्वर माऊली आणि संजीवन समाधी हे जणू जोडीने येणारे शब्द आहेत, किंबहुना संजीवन समाधी म्हटलं की माऊली आठवतात.

जिवंत समाधी आणि संजीवन समाधी ह्या दोन्ही, अध्यात्माच्या दृष्टीने भिन्न कल्पना आहेत. जिवंत समाधीत साधक अन्न पाणी ह्यांचा त्याग करत नामस्मरण करत देहत्याग करतो, तो स्वेच्छेने स्वीकारलेला देहत्याग असतो. संजीवन समाधी मात्र खूप वेगळी अध्यात्मिक कल्पना आहे. संजीवन समाधीत तो योगी, समाधीत जातांना, त्याचे पंचप्राण बाहेरील पंचमहाभूतात विलीन होतात. आपले शरीर हे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश हया पंचमहाभूतांचे प्रतीक आहे. संजीवन समाधीत त्या योग्यांच्या शरीरातील पंचमहाभूते, पंचप्राण सभोवतालच्या ब्रम्हांडातील पंचमहाभूतांत विलीन होतात. शरीरातील पंचमहाभूते ब्रम्हांडातील पंचमहाभूतात विलीन झाल्यानंतर त्या समाधी स्थानी काहीच शिल्लक राहत नाही. त्या समाधी स्थानी शिल्लक राहते, ते चैतन्य, स्पंदने आणि ऊर्जा शक्ति.

ज्ञानेश्वर माऊलींनी कार्तिक कृष्ण पक्ष तृतीयेला आळंदी येथे संजीवन समाधी घेतली. असे म्हणतात, माऊलींच्या समाधीचा मुहूर्त साक्षात भगवंताच्या सल्ल्याने ठरला. माऊलींनी आठवडाभर आधी आपली भावंडे, गुरू निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई ह्यांना समाधीबाबत कळवले आणि इतर संतांना कळवले. माऊलींची भावंडे शोकाकुल झाली त्यांनी आणि संतांनी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला, मात्र माऊली निश्चायाशी ठाम होते. शेवटी निवृत्तीनाथांनी आपल्या बंधूंना आशीर्वाद दिले. नामदेवपुत्रांनी तीन-चार दिवस आधी समाधीचे स्थान तयार केले. सिद्धबेटावरील समाधीचे स्थान तयार झाले. कार्तिक कृष्ण द्वादशीला माऊलींनी शेवटचे कीर्तन केले. मोठा जनसमुदाय जमला होता. सर्व जातींतील भक्त समुदाय आणि संत जन जमले होते. शेवटच्या कीर्तनानंतर माऊलींनी मौन धारण केले. मुक्ताबाई आणि जनाबाई ह्यांनी माउलींना स्वतःच्या हाताने मांडे खाऊ घातले. असे पंचपक्वान्नांचे जेवण जणू भगवंताचा प्रसाद म्हणून माउलींनी, अमृतरुपाने ग्रहण केला. कार्तिक कृष्ण त्रयोदशीला सिद्धबेटाचा परिसर टाळ, मृदुंग आणि भगवंताच्या नामस्मरणाने दुमदुमला. दुपारी मुहूर्ताला, निवृत्तीनाथ आणि नामदेवांनी माऊलींचे दोन्ही हात धरत समाधीकडे चालू लागले. समाधीस्थान वेली, फुले आणि तुळशीपत्रांनी सजवले होते. माउलींना निवृत्तीनाथ आणि संत नामदेव समाधीस्थळी नेत असताना साक्षात विठू माऊली हा सोहळा पाहत होती, असे म्हणतात. माऊलींच्या इच्छेनुसार ज्ञानेश्वरी ग्रंथ समोर ठेवला. माऊली गुहेत पद्मासनात बसले आणि त्यांनी दीर्घ

ओंकाराचा उच्चार करत असताना माउलींना दीर्घ समाधी लागली, त्यावेळी निवृत्तीनाथांनी गुहेचे द्वार, म्हणजेच शिळा बंद केली. हया संजीवन समाधीत माऊलींच्या शरीरातील पंचमहाभूते ब्रम्हांडातील पंचमहाभूतात विलीन झाली, तो योगी जणू निर्देही झाला. समाधीच्या जागी प्रथम तेजोमय मूर्ती अवतरली आणि त्यानंतर वायुतत्त्व लोप पावले आणि सूक्ष्म रूपातील चैतन्य, स्पंदने आणि ऊर्जा शिल्लक राहिली.

संजीवन समाधीत तो योगी ब्रम्हांडातील पंचमहाभूतांद्वारे पुन्हा कायाप्रवेश करुन आपल्या भक्तांना दर्शन देत असतात अशी धारणा आहे.

आजही आळंदीच्या समाधिस्थानी ध्यानस्थ होत असलेल्या साधकांना ओंकार ऐकू येतो. त्या समाधीस्थानी शांतपणे दर्शन घेत असताना, डोळ्यात अश्रू येतात, एका दिव्य वातावरणाची अनुभूती मिळते.

आळंदीला आजही माऊलींच्या समाधीस्थानी, गाभाऱ्यात प्रवेश करताना, शांत आणि सहजपणे भक्तिरस उचंबळून येतो,

"समाधी साधन
संजीवन नाम
शांती दया सम
सर्वांभूती".

**- मनोज कुरुंभटी**